जालना जिल्ह्यात पाणीवापरावर निर्बंध

वाहने धुण्यास मनाई; व्यावसायिक जलतरण तलाव बंद करण्याचे आदेश

लोकसत्ता वार्ताहर

जालना : दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पाणीटंचाई संपेपर्यंत जालना शहर व ग्रामीण भागातील पाणी वापरावर जिल्हा प्रशासनाने अनेक निर्बंध घातले आहेत. शहरी भागात घरगुती नळाच्या किंवा कुपनलिकेच्या पाण्याने वाहने धुण्यास तसेच रस्ते व अंगणात पाणी मारण्यास पूर्णपणे बंदी राहणार आहे. वाहन पुसण्यासाठी केवळ ओल्या कापडाचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले. व्यावसायिक व खासगी जलतरण तलाव तत्काळ बंद करण्याचे तर नवीन बांधकामांसाठी पिण्यायोग्य पाण्याचा वापर पूर्णपणे थांबविण्याचे आदेश देण्यात आले आहेत. नळ गळती व पाण्याचा अपव्यय करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

ग्रामीण भागात अनधिकृत पाणी उपशावर बंदी घालण्यात आली असून धरण, कालवे, नद्या व तलावांमधून पिण्याव्यतिरिक्त इतर कारणांसाठी होणारा पाणी उपसा रोखण्यासाठी महसूल व जलसंपदा विभागाच्या संयुक्त पथकांकडून गस्त घालण्यात येणार आहे. टँकरद्वारे होणाऱ्या पाणीपुरवठ्याचा वापर केवळ पिण्यासाठी व घरगुती कारणांसाठी करण्याच्या सूचना ग्रामपंचायतींना देण्यात आल्या आहेत.

प्रातिनिधीक छायाचित्र

‘ठिबक’चा वापर करण्याचे आवाहन

शेतीसाठी ठिबक व तुषार सिंचनाचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले असून, उपलब्ध पाण्याचे नियोजन करूनच पिकांची निवड करण्याचे आदेश शेतकऱ्यांना देण्यात आले आहेत.

महाराष्ट्र भूजल अधिनियमानुसार निर्बंध लागू करण्यात आले आहेत. सार्वजनिक जलस्त्रोतांपासून पाचशे मीटर अंतराच्या परिसरात पिण्याच्या पाण्याव्यतिरिक्त इतर कारणांसाठी नवीन विहीर किंवा कूपनलिका खोदण्यास बंदी घालण्यात आली आहे. तसेच साठ मीटरपेक्षा अधिक खोलीच्या विंधन विहीरी खोदण्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत. अनधिकृत विंधन विहिरी खोदल्यास गुन्हे दाखल करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांवर विपरीत परिणाम करणाऱ्या खासगी विहिरी किंवा विंधन विहिरींतून पाणी उपसा करण्यास तात्पुरती बंदी घालण्यात आली असल्याची माहिती जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिली.

बीडमध्ये संचमान्यता मिळवण्यासाठी जिल्ह्याबाहेरील विद्यार्थी

प्रशासनाची कारवाई

लोकसत्ता वार्ताहर

बीड : बीडमधील खासगी शिक्षण संस्थांमध्ये संचमान्यता मिळवण्यासाठी आणि शिक्षकपदे वाचवण्यासाठी सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या खोट्या खरेदी-विक्रीचा एक प्रकार उघडकीस आला आहे. येथील चंपावती विद्यालयात प्राथमिक शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण यांनी केलेल्या अचानक पाहणीत इतर जिल्ह्यातील ‘यू-डायस’ आयडीवर नोंद असलेल्या तीन विद्यार्थ्यांचे चक्क कागदोपत्री बनावट प्रवेश दाखवल्याचे निष्पन्न झाले आहे.

या गंभीर गैरव्यवहाराचा सविस्तर अहवाल शिक्षण आयुक्तांकडे (पुणे) सादर करण्यात आला आहे. ऑगस्ट ते सप्टेंबर या संचमान्यतेच्या काळात इतर राज्यातील किंवा इंग्रजी शाळांमधील विद्यार्थ्यांचे यू-डायस आयडी बेकायदेशीरपणे वापरून कागदोपत्री प्रवेश दाखवले जात होते. संचमान्यता मंजूर होऊन पदे सुरक्षित झाल्यावर या विद्यार्थ्यांना पुन्हा त्यांच्या मूळ शाळांच्या यू-डायस आयडीवर वर्ग केले जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारींची गंभीर दखल घेत शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण यांनी चंपावती शाळेला भेट देऊन सखोल तपासणी केली.

त्यात इतर जिल्ह्यातील तीन विद्यार्थी कागदावरच असल्याचे उघड झाले. २८ सप्टेंबरला या तीन विद्यार्थ्यांचा शाळेत ऑनलाइन प्रवेश झालेला आहे, तर ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात या विद्यार्थ्यांचे नाव ऑनलाइन प्रणालीतून कमी करण्यात आलेले आहे.

भ्रष्टाचार निर्मूलन समितीचा पाठपुरावा

या संपूर्ण गैरव्यवहाराविरोधात भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे राज्य अध्यक्ष, अभियंता सादिक इनामदार यांनी मुख्यमंत्री वरिष्ठ राजकारण्यांकडे पाठपुरावा केला आहे. तसेच, २०२२ ते २०२६ दरम्यान संचमान्यतेच्या काळात अचानक पटसंख्या वाढवणाऱ्या शाळांची विशेष तपासणी पथकामार्फतचौकशी व्हावी आणि संबंधितांवर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी त्यांनी केली आहे.

शिक्षण आयुक्तांच्या आदेशानुसार आम्ही संबंधित शाळेत जाऊन सखोल चौकशी केली. या तपासात अनेक गंभीर अनियमितता व त्रुटी आढळल्या. यासंदर्भातील सविस्तर गोपनीय अहवाल शिक्षण आयुक्तांकडे सादर करण्यात आला आहे. वरिष्ठांकडून पुढील सूचना आल्यानंतर संबंधित शाळा व दोषींवर कडक कायदेशीर कारवाई केली जाईल. **– जयश्री चव्हाण,** शिक्षणाधिकारी (प्रा.)

संतोष देशमुख हत्याप्रकरणी विष्णू चाटेचा जामीन फेटाळला

लोकसत्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील आरोपी विष्णू महादेव चाटे याचा जामीन अर्ज मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्यायाधीश आर. एम. जोशी यांनी फेटाळला. खंडणीची मागणी, आवादा कंपनीचे काम बंद पाडण्याचा प्रयत्न आणि त्याला विरोध करणाऱ्या संतोष देशमुख यांच्या हत्येच्या कटात चाटेचा प्रथमदर्शनी सहभाग दिसून येत असल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदविले. संपर्काचा तपशील, सीसीटीव्ही फुटेज आणि आवाजाच्या नमुन्याचा न्यायवैद्यक प्रयोगशाळेचा अहवाल हे पुरावे विचारात घेत न्यायालयाने हा निर्णय दिला.

एकत्रित दोषारोपपत्राचा मुद्दा

तीन गुन्ह्यांचे एकत्रित दोषारोपपत्र आणि मकोका लागू करण्याबाबतचा बचाव पक्षाचा आक्षेप न्यायालयाने स्वीकारला नाही.

पैठणमधील १२ मंदिरांत नवरात्रोत्सव

लोकसत्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : पैठणमध्ये देवींची वेगवेगळी बारा मंदिरे असून, त्यामध्ये मुंबादेवीचाही एक समावेश आहे. मुंबादेवीचे मंदिर मुंबईतीलच सर्वश्रुत आहे. पैठणमधील देवीच्या मंदिरांमध्ये रविवारपासून नवरात्राचा उत्सव साजरा करण्याची तयारी पूर्ण झाली आहे. घटस्थापनेने उत्सवाला प्रारंभ होणार आहे. या सर्व मंदिरांना शेकडो आणि प्राचीन परंपरा आहे.

सातवाहन काळातील बाजारपेठेचे एक महत्त्वाचे शहर असलेल्या पैठणमध्ये ऐतिहासिक आणि पौराणिक संदर्भाची देवीची ही मंदिरे आहेत. पैठणमध्ये १२ देवींच्या मंदिरांसोबतच १२ महादेव आणि १२ गणपती मंदिरेही असून, त्यामुळे पैठणला मराठवाड्यातील एक अद्वितीय तीर्थक्षेत्र मानले जाते.

देवींची मंदिरे

संतोषी माता मंदिर (जुने नवनाथ मंदिर), कालिका माता (जुनी रंगारहट्टी गल्ली), भद्रकाली देवी (जुनी जर गल्ली), रेणुका देवी (हताई गल्ली), दुर्गा देवी (जुनी दुर्गावाडी), रेणुकामाता (लोळगे निवास, जुनी सुतारपार गल्ली), तुळजामाता मंदिर (पिटुंबरा गल्ली), मंडई देवी (कापड मंडई), मुंबादेवी (भोईवाडा), गिरजा देवी मंदिर (जैनपुरा गल्ली), कालिका माता (कहारवाडा गल्ली) तुळजामाता मंदिर (त्रिंबकदासनगर).

कडेठाणची देवी

पैठण तालुक्यातील कडेठाण येथे महालक्ष्मी अंबाबाईचे उपपीठ मंदिर असल्याचे मानले जाते. मुदळवाडी येथे तुळजाभवानी व रेणुका मातेचे मंदिर आहे. नांदर व विहामांडवा, हिवरा चोंडाळा येथेही रेणुका देवीचे उपपीठ मानले जाणारे मंदिर आहे. नवरात्रोनिमित्त आयोजित महाउत्सवात महाराष्ट्रातील देवीभक्त याही देवींच्या दर्शनासाठी रूढी परंपरा व चालीरीतीप्रमाणे येतात, असे स्थानिक ग्रामस्थांनी सांगितले.

सावित्रीबाई दिपके यांचे निधन

हिंगोली : सावित्रीबाई दिपके (वय ८५) यांचे शनिवारी सकाळी अल्पशा आजारामुळे निधन झाले. त्या ‘कॉक्रोच जनता पार्टी’चे संस्थापक अध्यक्ष अभिजित दिपके यांच्या आजी होत. त्यांच्या पार्थिवावर हिंगोलीनजीकच्या त्यांच्या गावी उद्या रविवारी सकाळी १० वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत, अशी माहिती त्यांच्या निकटवर्तीयांनी दिली.

हिंगोलीनजीक असलेले संतुक पिंपरी हे दिपके यांचे मूळ गाव आहे. वृद्धापकाळाने त्या आजारी होत्या, त्यांचे शनिवारी निधन झाले.

बीडमध्ये शिक्षकाची आत्महत्या

बीड : शहराच्या खंडेश्वरी देवी परिसरातील विहिरीत शनिवारी सकाळी एका शिक्षकाचा मृतदेह आढळून आला. या मृतदेहाची ओळख पटली असल्याची माहिती पेठ बीड पोलिसांनी दिली.

त्यांनी आत्महत्येपूर्वी राहत्या घरी चिठ्ठी लिहून ठेवल्याची आणि पत्नीला मोबाइल फोनवर पाठवलेल्या संदेशात संपत्ती कुठे-कुठे आहे, याची माहिती पुढे आली आहे. मात्र, चिठ्ठीत नेमके काय नमूद आहे किंवा कोणाच्या नावाचा उल्लेख आहे, याचा तपशील शनिवारी सायंकाळपर्यंत समोर आला नव्हता.

लोकसत्ता Classifieds

वृद्धाश्रम

अत्यंत उर्मट, उद्धट, हेकट, हट्टी आपले तेच खरे करणारया वयोवृद्ध, एकाकी व्यक्तींचा सुद्धा अत्यंत प्रेमाने आपुलकीने सांभाळ करणारे केळकर काका 8788882602 .

0090413594-1

मुंबईकरांच्या पसंतीस उतरलेले ‘पा ओल्ड एज होम’ स्वच्छ टापटीप हवेशीर प्रदूषणमुक्त निटनेटके प्रेमळ मनमोकळे घरगुती वातावरण वर्षा मॅडम 9370043907

0090413595-1

महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींना मजकूर (अॅडव्हर्टाइझिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींसोबत व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

IndiaShelter Home Loans

इंडिया शेल्टर फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : प्लॉट नं. 15, सहावा मजला, सेक्टर – 44, इंस्टीट्युशनल एरिया, गुरुग्राम हरियाणा – 122002

ताबा सुचना अचल संपत्ती करीता

ज्या अर्थी, खाली सही करणारे इंडिया शेल्टर फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड यांचे प्राधिकृत अधिकारी यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अधिनियम, 2002 अन्वये तसेच कलम 13(12) सह सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, 2002 मधील नियम 3 अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून, खाली नमूद केलेल्या खात्याविरुद्ध नमूद दिनांकास मागणी नोटीस जारी केली होती व कर्जदार तसेच मालमत्तेचे मालक/जामीनदार यांना सदर नोटीसच्या दिनांकापासून 60 दिवसांच्या आत थकीत रकमेची परतफेड करण्यास सांगितले होते. आणि ज्या अर्थी, मालमत्तेचे मालक व इतर संबंधित व्यक्तींनी सदर रकमेची परतफेड करण्यात कसूर केली आहे, त्याअनुषंगाने खाली नमूद कर्जदारांना तसेच सर्वसामान्य जनतेस याद्वारे नोटीस देण्यात येते की, खाली सही करणाऱ्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी सदर अधिनियमाच्या कलम 13(4) अन्वये तसेच सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, 2002 मधील नियम 8 व 9 सह वाचून प्राप्त अधिकारांचा वापर करून, खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा/मालमत्तांचा **ताबा** संबंधित खात्यासमोर नमूद केलेल्या दिनांकास घेतला आहे. कायद्याच्या कलम १३(८) मधील तरतुदीनुसार सुरक्षित मालमत्ता विमोचित करण्यासाठी उपलब्ध असलेल्या कालावधीबाबत कर्जदारांचे लक्ष वेधण्यात येत आहे. यापुढे, विशेषतः कर्जदारांना तसेच सर्वसामान्य जनतेला सूचित करण्यात येते की, त्यांनी वरील मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये. सदर मालमत्तेबाबत करण्यात येणारा कोणताही व्यवहार हा खाली नमूद केलेल्या थकबाकीच्या रकमेवर तसेच त्यावरील व्याज, खर्च इत्यादी बाबींकरिता इंडिया शेल्टर फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्या हक्काधीन राहील.

अ. क्र.	कर्जदार / जमानतदाराचे नाव (संपत्तीचे मालक) आणि कर्ज खाते क्रमांक	चार्ज / गहाणवार संपत्तीचे वर्णन (संपत्तीचा सर्व भाग व तुकडा समाविष्ट)	मागणी सूचनेची तारीख, देय रक्कम मागणी सुचनेच्या तारखेनुसार
1.	श्री. बालाजी कोंडिबा कोंडामंगल, श्री. किशन कोंडिबा कोंडामंगल आणि श्रीमती वर्षा किशन कोंडामंगल सर्व राहणार: ग्रामपंचायत घर क्र. 163/2, चिकाळा, ता. मुदखेड, जि. नांदेड, महाराष्ट्र - 431806 कर्ज खाते क्र. HLNARNLONS000005098858	जमीन व त्यावरील बांधकामाचा सर्व भाग आणि तुकडा, ग्रामपंचायत घर क्र. 163/2, चिकाळा, ता. मुदखेड, जि. नांदेड, महाराष्ट्र – 431806 येथे स्थित, एकूण क्षेत्रफळ 318 चौ. फूट. चतुर्सिमा: पूर्वेस – श्री. दत्ता यांची जमीन, पश्चिमेस – ग्रामपंचायत रस्ता (जी.पी. रोड), उत्तरेस – ग्रामपंचायत रस्ता (जी.पी. रोड), दक्षिणेस – मारुत यांची जमीन.	मागणी नोटीस दिनांक 12.07.2026 रु. 5,07,901/- (रुपये पाच लाख सात हजार नऊशे एक फक्त) दि. 10.07.2026 पर्यंत थकबाकी असून, 11.07.2026 पासून देय व्याजासह तसेच इतर शुल्क व खर्च रकमेचा भरणा होईपर्यंत लागू राहील **ताबा दिनांक : 08/10/2026 सांकेतिक**

स्थळ : नांदेड, तारीख : 11.10.2026 — इंडिया शेल्टर फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड, अधिकृत अधिकारी

कोणत्याही प्रश्नासाठी कृपया श्री. तुषार हुरडे (+91 7350002453) यांच्याशी संपर्क साधा.

IDBI BANK CIN:L65190MH2004GOI148838

आयडीबीआय बँक लिमिटेड (शाखा - औरंगपुरा आणि व्हर्टिकल - आरबीजी) शाखेचा पत्ता :- आयडीबीआय बँक लिमिटेड, औरंगपुरा, छत्रपती संभाजीनगर, IMA हॉल, शनी मंदिराजवळ, विवेकानंद कॉलेज रोड, केसरसिंगपुरा, समर्थ नगर, छत्रपती संभाजीनगर, पिन कोड – 431001, महाराष्ट्र.

कारणे दाखवा नोटीस

कर्जदार :- हायजिया पेस्ट मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता :- D/05, नवरत्न सीएचएस लिमिटेड, 60, गोराई 01, बोरिवली पश्चिम – 400091.

खाली नमूद केलेल्या संस्था / व्यक्तींना नोटीस

IDBI बँक लिमिटेड (“बँक”) ने खाली नमूद केलेल्या संस्था / व्यक्तींविरुद्ध (“आपण” / “आपले”) **दिनांक 28 नोव्हेंबर 2025 तसेच दिनांक 30 जुलै 2024** रोजीच्या ‘रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (व्यावसायिक बँका – जाणूनबुजून कर्जबुडवे आणि मोठ्या कर्जबुडव्यांबाबतची कार्यपद्धती) निर्देश, 2025’ (“RBI मास्टर निर्देश”) अंतर्गत कार्यवाही सुरु केली होती. तसेच, ‘जाणूनबुजून कर्जबुडवे ओळख समिती I/II’ (“WDIC I/II”) यांच्या प्रथमदर्शनी मताच्या आधारे **दिनांक 14-11-2025 रोजी** कारणे दाखवा नोटीस (“SCN”) जारी केली होती. समितीच्या प्रथमदर्शनी मतानुसार, खाली नमूद केलेल्या निकषांपैकी एक किंवा अधिक निकषांच्या संदर्भात ‘जाणूनबुजून कर्जबुडवेपणा’ (Wilful Default) च्या एक किंवा अधिक घटना घडल्याचे दिसून येते:

अ. क्र.	नाव आणि पत्ता	पदनाम	जाणूनबुजून कर्जबुडवेपणाचे निकष*
1.	हायजिया पेस्ट मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेड	कर्जदार	RBI मास्टर निर्देश, 2024 मधील कलम 3(1)(t)(i)(B), सहवाचित उपकलम 3(1)(h)(iv) नुसार
2.	मनोज सुदाम कसारे	(हायजिया पेस्ट मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेडचे प्रवर्तक / संचालक) व जामीनदार	RBI मास्टर निर्देश, 2024 मधील कलम 3(1)(t)(i)(B), सहवाचित उपकलम 3(1)(h)(iv) व 3(1)(t)(ii) नुसार.
3.	नितीन गजानन तांबे	(हायजिया पेस्ट मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेडचे प्रवर्तक / संचालक) व जामीनदार	RBI मास्टर निर्देश, 2024 मधील कलम 3(1)(t)(i)(B), सहवाचित उपकलम 3(1)(h)(iv) व 3(1)(t)(ii) नुसार.
4.	सुहास एकनाथ कदम	(हायजिया पेस्ट मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेडचे प्रवर्तक / संचालक) व जामीनदार	RBI मास्टर निर्देश, 2024 मधील कलम 3(1)(t)(i)(B), सहवाचित उपकलम 3(1)(h)(iv) व 3(1)(t)(ii) नुसार.

सदर कारणे दाखवा नोटीस (SCN) परत आल्यामुळे / बजावली न गेल्यामुळे, या प्रकाशनाच्या दिनांकापासून 21 (एकवीस) दिवसांच्या आत, आपल्याला ‘जाणूनबुजून कर्जबुडवे’ (Wilful Defaulter) म्हणून घोषित करून त्याबाबतची माहिती क्रेडिट इन्फॉर्मेशन कंपन्यांना कळविण्यात येऊ नये, यासाठी आपल्याकडे बँकेसमोर काही म्हणणे असल्यास ते सादर करण्याकरिता याद्वारे नोटीस देण्यात येत आहे. वरील नमूद कालावधीत कारणे दाखवा नोटिशीच्या (SCN) विरोधात कोणतेही निवेदन / म्हणणे प्राप्त न झाल्यास, आपल्याला काहीही सादर करावयाचे नाही, असे गृहीत धरले जाईल.

• आपण **IDBI Bank Ltd., प्रादेशिक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर, रेणुका कॉम्प्लेक्स, घर क्र. 5-6-15, CTS क्र. 17325, दुसरा मजला, संत एकनाथ रंगमंदिरासमोर, छत्रपती संभाजीनगर, पिन कोड: 431005, महाराष्ट्र** येथून SCN नोटीस प्राप्त करू शकता. त्यासाठी आपण स्वतः किंवा योग्यरीत्या अधिकृत केलेल्या प्रतिनिधीमार्फत (ओळखीचा पुरावा सादर करून) नोटीस प्राप्त करू शकता. तसेच, आपल्या नोंदणीकृत ई-मेल आयडीवरून बँकेच्या **anurag.pagare@idbi.co.in / basawant.birajdar@idbi.co.in / hemant.amrute@idbi.co.in** या ई-मेल पत्त्यांवर ई-मेल पाठवूनही सविस्तर नोटीस प्राप्त करू शकता.

• आपण बँकेकडून सविस्तर कारणे दाखवा नोटीस (SCN) प्राप्त केली आहे किंवा नाही, याची पर्वा न करता, ही नोटीस आपल्याला SCN ची वैध व पुरेशी बजावणी झाल्याचे मानण्यात येईल.

आपल्याला ‘जाणूनबुजून कर्जबुडवे’ (Wilful Defaulter) म्हणून घोषित करण्यात आल्यास, लागू RBI मार्गदर्शक तत्त्वांनुसार तसेच कायदा व करारानुसार, आपल्याविरुद्ध आवश्यक ती कारवाई करण्याचा अधिकार बँकेने राखून ठेवलेला आहे, याची आपण नोंद घ्यावी.

आपला विश्वासू, अधिकृत अधिकारी.

IDBI BANK CIN:L65190MH2004GOI148838

आयडीबीआय बँक लिमिटेड (शाखा - वाळूज आणि व्हर्टिकल - आरबीजी) शाखेचा पत्ता :- आयडीबीआय बँक लिमिटेड, वाळूज, प्लॉट क्र. X-26/1, मोरे चौक, हॉटेल नैवेद्यजवळ, वाळूज एमआयडीसी, छत्रपती संभाजीनगर, पिन कोड – 431136, महाराष्ट्र.

कारणे दाखवा नोटीस

कर्जदार :- ग्लोबल पॅकेजिंग इंडस्ट्रीज

नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता :- गट क्र. 32, प्लॉट क्र. 02, रांजणगाव, वाळूज, औरंगाबाद.

खाली नमूद केलेल्या संस्था / व्यक्तींना नोटीस

IDBI बँक लिमिटेड (“बँक”) ने खाली नमूद केलेल्या संस्था / व्यक्तींविरुद्ध (“आपण” / “आपले”) **दिनांक 28 नोव्हेंबर 2025 तसेच दिनांक 30 जुलै 2024** रोजीच्या ‘रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (व्यावसायिक बँका – जाणूनबुजून कर्जबुडवे आणि मोठ्या कर्जबुडव्यांबाबतची कार्यपद्धती) निर्देश, 2025’ (“RBI मास्टर निर्देश”) अंतर्गत कार्यवाही सुरु केली होती. तसेच, ‘जाणूनबुजून कर्जबुडवे ओळख समिती I/II’ (“WDIC I/II”) यांच्या प्रथमदर्शनी मताच्या आधारे दिनांक **14-11-2025** रोजी कारणे दाखवा नोटीस (“SCN”) जारी केली होती. समितीच्या प्रथमदर्शनी मतानुसार, खाली नमूद केलेल्या निकषांपैकी एक किंवा अधिक निकषांच्या संदर्भात ‘जाणूनबुजून कर्जबुडवेपणा’ (Wilful Default) च्या एक किंवा अधिक घटना घडल्याचे दिसून येते:

अ. क्र.	नाव आणि पत्ता	पदनाम	जाणूनबुजून कर्जबुडवेपणाचे निकष*
1.	ग्लोबल पॅकेजिंग इंडस्ट्रीज	कर्जदार	RBI मास्टर निर्देश, 2024 मधील कलम 3(1)(t)(i)(A) व 3(1)(t)(ii) नुसार.
2.	अनुजा अनिल सावळे उर्फ सीमा अनिल सावळे	भागीदार	RBI मास्टर निर्देश, 2024 मधील कलम 3(1)(t)(i)(A) व 3(1)(t)(ii) नुसार.
3.	नंदा रामेश्वर शिंदे	भागीदार	RBI मास्टर निर्देश, 2024 मधील कलम 3(1)(t)(i)(A) व 3(1)(t)(ii) नुसार.
4.	रेणुका गणेश मातकर	भागीदार	RBI मास्टर निर्देश, 2024 मधील कलम 3(1)(t)(i)(A) व 3(1)(t)(ii) नुसार.
5.	गणेश विनायक मातकर	भागीदार	RBI मास्टर निर्देश, 2024 मधील कलम 3(1)(t)(i)(A) व 3(1)(t)(ii) नुसार.

सदर कारणे दाखवा नोटीस (SCN) परत आल्यामुळे / बजावली न गेल्यामुळे, या प्रकाशनाच्या दिनांकापासून 21 (एकवीस) दिवसांच्या आत, आपल्याला ‘जाणूनबुजून कर्जबुडवे’ (Wilful Defaulter) म्हणून घोषित करून त्याबाबतची माहिती क्रेडिट इन्फॉर्मेशन कंपन्यांना कळविण्यात येऊ नये, यासाठी आपल्याकडे बँकेसमोर काही म्हणणे असल्यास ते सादर करण्याकरिता याद्वारे नोटीस देण्यात येत आहे. वरील नमूद कालावधीत कारणे दाखवा नोटिशीच्या (SCN) विरोधात कोणतेही निवेदन / म्हणणे प्राप्त न झाल्यास, आपल्याला काहीही सादर करावयाचे नाही, असे गृहीत धरले जाईल.

• आपण **IDBI Bank Ltd., प्रादेशिक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर, रेणुका कॉम्प्लेक्स, घर क्र. 5-6-15, CTS क्र. 17325, दुसरा मजला, संत एकनाथ रंगमंदिरासमोर, छत्रपती संभाजीनगर, पिन कोड: 431005, महाराष्ट्र** येथून सविस्तर कारणे दाखवा नोटीस (SCN) प्राप्त करू शकता. त्यासाठी आपण स्वतः किंवा योग्यरीत्या अधिकृत केलेल्या प्रतिनिधीमार्फत (ओळखीचा पुरावा सादर करून) नोटीस प्राप्त करू शकता. तसेच, आपल्या नोंदणीकृत ई-मेल आयडीवरून बँकेच्या खालील ई-मेल पत्त्यांवर ई-मेल पाठवूनही सविस्तर नोटीस प्राप्त करू शकता: **anurag.pagare@idbi.co.in / basawant.birajdar@idbi.co.in / hemant.amrute@idbi.co.in**

• आपण बँकेकडून सविस्तर कारणे दाखवा नोटीस (SCN) प्राप्त केली आहे किंवा नाही, याची पर्वा न करता, ही नोटीस आपल्याला SCN ची वैध व पुरेशी बजावणी झाल्याचे मानण्यात येईल.

आपल्याला ‘जाणूनबुजून कर्जबुडवे’ (Wilful Defaulter) म्हणून घोषित करण्यात आल्यास, लागू RBI मार्गदर्शक तत्त्वांनुसार तसेच कायदा व करारानुसार, आपल्याविरुद्ध आवश्यक ती कारवाई करण्याचा अधिकार बँकेने राखून ठेवलेला आहे, याची आपण नोंद घ्यावी.

आपला विश्वासू, अधिकृत अधिकारी.

पंजाब नैशनल बैंक भारत सरकारचा उपक्रम pnb punjab national bank (A Govt. of India Undertaking)

एआरएमबी, नाशिक

शॉप नं.2 व 3 मेझनाईन मजला, स्नेह हाईट अपार्टमेंट, इंदिरा नगर, नाशिक - 422009. फोन : 0253- 2323020, ईमेल- cs8288@pnb.bank.in

सेक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 मधील नियम 8 व 9 अन्वये तमाम लोकांकरीता ई-लिलाव विक्री नोटीस

स्थावर / अस्थावर मिळकतींची विक्री करण्याकरीता ई-लिलाव विक्री नोटीस

(सरफेसी कायदा, 2002 मधील नियम 8(6) अन्वये वैधानिक विक्री नोटीस)

सेक्युरिआयझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट अॅन्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टरेस्ट अॅक्ट 2002 कलम 13 (4) अंतर्गत मधील नियम 8(6), सेक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या अन्वये स्थावर / अस्थावर मिळकतींची विक्री ई- लिलाव पध्दतीने करण्या संदर्भात

तमाम लोकांस व विशेषतः कर्जदार व हमीदार ज्यांचे वर्णन खालील तक्त्यामध्ये केले आहे त्यांना सदर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमूद स्थावर/ अस्थावर मिळकती ज्या सेक्युअर्ड क्रेडीटर यांचेकडे गहाण / ताब्यामध्ये आहेत, ज्याचा रचनात्मक / प्रत्यक्ष / प्रतिकात्मक ताबा अधिकृत अधिकारी, पंजाब नॅशनल बँक, सेक्युअर्ड क्रेडीटर यांनी घेतला आहे. अधिकृत अधिकारी, त्यांची विक्री **"जसे आहे तसे", "जिथे आहे तिथे" व "जशी आहे" त्या स्थितीत" खालील तारखेस** कर्जदार/ गहाणदार / हमीदार यांचेकडून देय रक्कम वसूल करण्याकरीता, पंजाब नॅशनल बँक, सेक्युअर्ड क्रेडीटर, यांचेद्वारे करण्यात येणार आहे. राखीव किंमत व अनामत रक्कम व स्थावर मिळकतीचे किमान वर्णन व त्यावर असलेला बोजा (काही असल्यास) यांची माहिती खालीलप्रमाणे

लॉट क्र.	शाखेचे नाव खात्याचे नाव कर्जदार / जामीनदाराचे नाव आणि पत्ता	मिळकतीचे वर्णन आणि कर्जदार / गहाणदार यांची नावे	अ) मागणी सूचनाकलम १३(२) प्रमाणे दिनांक ब) थकबाकी रक्कम दि. ३०.०९.२०२६ रोजी क) ताबा दिनांक कलम १३(४) सरफेसी कलम २००२ प्रमाणे ड) ताबा प्रकार सांकेतिक / प्रत्यक्ष / रचनात्मक	अ) अनामत रक्कम (रु. लाख) ब) ईएमडी (ईएमडी जमा करण्याची शेवटची तारीख) क) बोली वाढीव रक्कम	लिलावाचे दिनांक व वेळ	कर्जदारांच्या बोझाचा तपशील
१.	**शाखा:** PNB- जळगाव (0222) **कर्जदार:** सौ.आरती जयप्रकाश बाविस्कर 1. पत्ताःप्लॉट नंबर-04, साने गुरुजी कॉलनी, टेलिफोन नगर, भागीरथी शाळेच्या मागे, जळगाव, महाराष्ट्र-425001 2. पत्ताःवाघूर जलाशय, तालुका-बोदवड, जळगाव- महाराष्ट्र- 424 206	गट क्र.36/1/पै येथील NA जमिन, जयनगर बोदवड, मौजे-बोदवड नगर पंचायत, तालुका-बोदवड जिल्हा जळगाव येथे 892.75 चौरस मीटर क्षेत्रफळ असलेल्या प्लॉट क्र.37,38,47 आणि 56. **श्रीमती आरती जयप्रकाश बाविस्कर यांच्या मालकीची** **प्रॉपर्टी आयडी: PUNB0082880ARTI**	अ) १६.१०.२०२५ ब) रु. ५५,०७,०६३.०९ अधिक व्याज आणि खर्च क) ०४.०२.२०२६ ड) सांकेतिक ताबा	अ) रु. ५६.६५ लाख ब) रु. ५.६६५ लाख (२७.१०.२०२६) क) रु. १.००/- लाख	दि. २७.१०.२०२६ वेळ सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत	माहित नाही
२	**शाखा:** PNB-जळगाव(0222) **कर्जदार: श्रीमती सीमा वसंत पाटील** 1-पत्ता:श्रीकृष्ण नगर, जुना नशिराबाद रोड, ता. व जिल्हा- जळगाव, महाराष्ट्र - 425001 2. पत्ता:वाघूर जलाशय, तालुका-बोदवड,महाराष्ट्र- 424 206 **जामीनदार /गहाणदार:** **1. श्री. जयप्रकाश पुंडलिकराव बाविस्कर** पत्ता: A-402, पाटलीपुत्र बिल्डिंग, लोखंडवाला कॉम्प्लेक्स रोड,अंधेरी पश्चिम, महाराष्ट्र- 400 048	जयनगर, बोदवड(मौजे-बोदवड नगर पंचायत, तालुका-बोदवड, जिल्हा-जळगाव) येथील गट क्र. ३६/१ (एकुण क्षेत्रफळ ८२०.८७ चौ.मी.) मधील अकृषिक (N A) जमिनीचा भाग, ज्यामध्ये खालील भूखंडांचा समावेश आहे: भूखंड क्र. ५१ (क्षेत्रफळ २७१.५० चौ.मी.), भूखंड क्र. ५३ (क्षेत्रफळ २६७.५० चौ.मी.) आणि भूखंड क्र. ५५ (क्षेत्रफळ २७७.८७ चौ.मी.). **मालक: श्री. जयप्रकाश पुंडलिकराव बाविस्कर** **मालमत्ता क्रमांक : PUNB0082880SEEMA**	अ) १६.१०.२०२५ ब) रु. ५७,७३,२४५.६८ /- + पुढील व्याज + इतर शुल्क क) ०४.०२.२०२६ ड) सांकेतिक ताबा	१. अ) रु. ५२.१० लाख ब) रु. ५.२१० लाख (२७.१०.२०२६) क) रु. १.०० लाख	दि. २७.१०.२०२६ वेळ सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत	माहित नाही
३	**शाखा:** PNB- जळगाव (0222) **कर्जदार :** सौ. शितल संदिप बाविस्कर 1. पत्ता:फ्लॅट नं-28, 'पारिजात' दत्तमंदिर रोड, त्रिमूर्ती हौसिंग सोसायटी, पिंपळ, ता व जिल्हा-जळगाव, महाराष्ट्र- 4250012. पत्ता:वाघूर जलाशय, तालुका-बोदवड, महाराष्ट्र- 424 206 **जामीनदार /गहाणदार:** **1. श्री. जयप्रकाश पुंडलिकराव बाविस्कर** पत्ता: A-402, पाटलीपुत्र बिल्डिंग, लोखंडवाला कॉम्प्लेक्स रोड,अंधेरी पश्चिम, महाराष्ट्र-400 048	जयनगर बोदवड (मौजे- बोदवड नगर पंचायत, तालुका- बोदवड, जिल्हा- जळगाव) येथील गट क्र. ३६/१ (एकुण क्षेत्रफळ ८०५.५० चौ.मी.) मधील खालीलप्रमाणे अकृषिक (N A) जमिनीचे भूखंड: प्लॉट क्र. ५० (क्षेत्रफळ १९८.० चौ.मी.), प्लॉट क्र. ५२ (क्षेत्रफळ ३८२.५० चौ.मी.) आणि प्लॉट क्र. ५४ (क्षेत्रफळ २२५.०० चौ.मी.). **मालक:** **श्री. जयप्रकाश पुंडलिकराव बाविसकर** **मालमत्ता आयडी : PUNB0082880SHITAL**	अ) १६.१०.२०२५ ब) रु. ५७,६४,७०५.९९ + इतर व्याज क) ०४.०२.२०२६ ड) सांकेतिक ताबा	१. अ) रु. ५१.११ लाख ब) रु. ५.१११ लाख (२७.१०.२०२६) क) रु. ५०,०००/-	दि. २७.१०.२०२६ वेळ सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत	माहित नाही
४	**शाखा : पीएनबी- औरंगाबाद महाराष्ट्र (०७०९१०)** **कर्जदार:** एरॉन वेल्डटेक इंजिनियरिंग प्रायव्हेट लिमिटेड पत्ता- गट क्रमांक ०७१, प्लॉट क्रमांक ५९ए, बीड बायपास, अथर्व क्लासिक जवळ, संभाजीनगर, महाराष्ट्र- ४३१००१ **संचालक :** **1. श्री आदर्श राजकुमार कश्यप** **पत्ता-** 1- 04 श्रीफळ, छत्रपती नगर, गारखेडा मल्हार चौक, संभाजीनगर, महाराष्ट्र- 431001 **पत्ता 2-** प्लॉट क्रमांक 67A, सेक्टर F I N 4 सिडको, संभाजीनगर- 431001 **2. श्री. भवानंद मधुकांत कश्यप** पत्ता- घर "जगतारा" गट क्रमांक ०७१, प्लॉट क्रमांक ५९ए, बीड बायपास, अथर्व क्लासिक जवळ, संभाजीनगर, ४३१००१ **जामीनदार/ तारणदार :** **1. सौ. श्वेता भवानंद कश्यप** पत्ता-घर "जगतारा" गट क्रमांक ०७१, प्लॉट क्रमांक ५९ए, बीड बायपास, अथर्व क्लासिक जवळ, संभाजीनगर, ४३१००१	1. भूखंड क्र. ५८ आणि ५९ मधील भूखंड क्र. ५९-ए आणि त्यावर बांधलेले घर; भूखंडाचे क्षेत्रफळ - अंदाजे २१५२ चौरस फूट, बांधकामाचे क्षेत्रफळ - अंदाजे १५९७ चौरस फूट; गट क्र. ७१, मौजे सातारा, तालुका व जिल्हा- संभाजीनगर, महाराष्ट्र. **मालकी नावे –** **भवानंद मधुकान्त कश्यप** **आणि श्वेता भवानंद कश्यप** **सीमा :** पूर्व - ७.५ मीटरचा रस्ता, पश्चिम - भूखंड क्र. ८२, **उत्तर** - भूखंड क्र. ५९-बी, **दक्षिण** - भूखंड क्र. ६० **मालमत्ता आयडी - PUNB8288AERON1** 2. औद्योगिक भूखंड क्र. C-4/7 आणि त्यावर केलेले बांधकाम; भूखंडाचे क्षेत्रफळ - अंदाजे २३३४.५० चौरस मीटर, बांधकामाचे क्षेत्रफळ - अंदाजे ६३६.२० चौरस मीटर; पैठण औद्योगिक क्षेत्र, गाव - मुधलवाडीच्या हद्दीत, ता - पैठण, जिल्हा - संभाजीनगर. मालक - **एरॉन वेल्डटेक इंजिनियरिंग प्रायव्हेट लिमिटेड मार्फत संचालक** **1. भवानंद मधुकान्त कश्यप.** **2. आदर्श राजकुमार कश्यप.** **सीमा : पूर्व** - भूखंड क्र. C-4/8, **पश्चिम** - भूखंड क्र. C-4/6, **उत्तर** - भूखंड क्र. E-3, **दक्षिण** - एमआयडीसी रस्ता(१५ मीटर रुंद) **मालमत्ता आयडी - PUNB8288AERON2**	अ) ०६/०३/२०२६ ब) रु. ४,९७,०६,७८६.०९ /- + इतर व्याज क) १५.०५.२०२६ ड) सांकेतिक ताबा	१. अ) रु. १२५.०० लाख ब) रु. १२.५० लाख (२७.१०.२०२६) क) रु. १.०० लाख १. अ) रु. १९४.८४ लाख ब) रु. १९.४८४ लाख (२७.१०.२०२६) क) रु. १.०० लाख	दि. २७.१०.२०२६ वेळ सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत	माहित नाही

विक्री ही सेक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ च्या विहित केलेल्या अटी व शर्ती खालील प्रमाणे
1. मालमत्तेची विक्री जशी आहे तशी आणि जशी आहे तशी आणि जे काही आहे ते आहे वर विक्री केली जात आहे.
2. खाली नमूद सुरक्षीत मालमत्तेची माहिती ही अधिकृत अधिकाऱ्यांच्या सर्वोत्तम माहितीनुसार नमूद केली आहे, परंतू अधिकृत अधिकारी हे त्यामध्ये असलेल्या कोणत्याही त्रुटीस, चुकीची माहितीस वा काही चुकल्यास उत्तर देण्यास जबाबदार राहणार नाहीत.
3. सदर विक्री ही दिनांक, 27.10.2026 @ सकाळी 11.00 ते संध्या. 4.00 वर **https://baanknet.com** वेबसाईटवर प्रदान केलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे खाली दिलेल्या स्वाक्षरीकर्त्याद्वारे केली जाईल
4. ई-लिलावात सहभागी होण्यासाठी बोलीदाराने राखीव किंमतीपेक्षा किमान एक बोली अनिवार्यपणे सादर करणे आवश्यक आहे.
5. विक्रीच्या तपशीलावर अटी व नियमांसाठी कृपया **www.pnb.bank.in.** आणि **https://baanknet.com** ही वेबसाईट पाहावी

दिनांक - ११.१०.२०२६
स्थळ - नाशिक

टीप : स्वैर भाषांतर: तफावत आढळल्यास मूळ इंग्रजी मजकूर ग्राह्य

स्वाक्षरी/-
श्री. शैलेश कुमार शेंडे
अधिकृत अधिकारी,
पंजाब नॅशनल बँक, (सिक्युअर्ड क्रेडिटर)